विषय :- गटबुके व ग्राम नकाशे अद्ययावत आणणे बाबत.

क्र. एस. व्हो. सी. आर. ३१५०/
पुणे, दिनांक : ७/६/१९९०

पुरवणी परिपत्रक

ग्रामनकाशे अद्ययावत आणणे कामी दिनांक १८/४/९० व ५/५/९० चे परिपत्रक पहावे. आता सदरचे परिपत्रकान्वये खालील प्रमाणे पुरवणी सूचना देण्यात येत आहेत.

जर गट नंबर चे नकाशामध्ये ओघळ, पायवाटा इत्यादी बाबत तपशील दर्शविला गेला नसेल तर मूळ सर्व्हे नंबरच्या नकाशा वरून त्या आधारे ओघळ, पायवाटा इत्यादि भौगोलिक परिस्थिती दर्शवून नकाशे अद्ययावत आणावेत. सदर बाबतीत जंगल पाहणी वेळी जागेवरील परिस्थितीची देखील खात्री करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत जाण्या येण्याबाबत नवीन हक्क निर्माण केले जाणार नाहीत याबाबत काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

ज्या गांवी जमीन एकत्रीकरण योजना पूर्ण झाली आहे अशा गांवी जमीन एकत्रीकरण योजने पूर्वी ज्या सर्व्हे नंबर, हिश्यांत क.जा.प. ची दुरुस्ती झाली असेल परंतु एकत्रीकरण योजनेत त्या क.जा.प. चा अंमल घेतला नसेल तर सदर दुरुस्ती अशा विशिष्ट गटांत करावी लागेल. परंतु जमीन एकत्रीकरण कायदा कलम ३१-अ प्रमाणे प्रथम शुध्दीपत्रक मंजूर झाल्याशिवाय अशी दुरुस्ती करता येणार नाही. तरी अशा केसेस प्रथम एकत्रीकरण योजना/गट नकाशे दुरुस्ती कामी त्वरीत ३१-अ अन्वये प्रस्ताव सादर केले जातील याची कटाक्षाने दक्षता घ्यावी किंवा जेथे अशा दुरुस्ती मुळे गटांचे अदलाबदलीवर परिणाम होत असल्यास दुरुस्ती योजना करावी लागेल. तरी अशा वेळी दुरुस्ती योजने कामी प्रस्ताव सादर करावा व शुध्दीपत्रक /दुरुस्ती योजना मंजूर करून घेऊन नंतरच जमीन एकत्रीकरण योजना/गट नकाशा दुरुस्त करावा.

[signature]
[ नवीन कुमार ]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख [म. रा.] पुणे.

प्रत : सर्व जिल्हाधिकारी ...